परिवहनेतर संवर्गातील व्हिंटेज (Vintage) व क्लासिक (classic) संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्याकरीता वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, मुंबई यांना प्राधिकृत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- एमव्हीआर-०३१८/प्र. क्र.१०५/परि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १६ मे, २०१८.

<u>वाचा</u>:- १) शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.एमटीए २७८९/१४/परि-३, दिनांक ११ मे १९८९.

२) शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.एमटीए २७८९/१४/परि-३, दिनांक २६ जून १९९०.

३) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.एमव्हीआर-०३९९/सीआर-६१२(एम)/ का.२(७)/ जा.क्र.२६६२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५२(१) नुसार परिवहनेतर संवर्गातील वाहनांचे नोंदणी नुतनीकरणापूर्वी मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ५६ (१) नुसार अश्या वाहनांचे यांत्रिक योग्यता प्रमाणपत्र शासनाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याकडून अथवा शासन मान्यताप्राप्त चाचणी केंद्राकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६५(१)(ड) नुसार योग्यता प्रमाणपत्र जारी करणे, त्याचे नुतनीकरण, दुय्यम प्रमाणपत्र जारी करणे इ. बाबतचे अधिकार राज्य शासनास आहेत. त्यानुसार “व्हिंटेज” व “क्लासिक” या संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्याकरीता वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, मुंबई या संस्थेस प्राधिकृत करण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन क्र.३ येथील पत्रान्वये शासनास सादर केला असून सदर बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६५(१)(ड) नुसार योग्यता प्रमाणपत्र जारी करणे, त्याचे नुतनीकरण, दुय्यम प्रमाणपत्र जारी करणे इ. करीता व्हिंटेज व क्लासिक संवर्गात मोडणाऱ्या परिवहनेतर संवर्गातील वाहनांसंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.:-

१) सदरची कार्यपध्दती ही परिवहनेतर संवर्गातील फक्त व्हिंटेज व क्लासिक या संवर्गातील व त्यानुसार व्हिंटेज व क्लासिक क्लब ऑफ इंडिया यांचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या वाहनांकरीताच अनुज्ञेय असेल.

२) व्हिंटेज अथवा क्लासिक दर्जा धारण करणाऱ्या परिवहनेतर संवर्गातील वाहनांना केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५२ नुसार नोंदणी नुतनीकरणापूर्वी मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ५६(१) नुसार यांत्रिक योग्यता तपासणी व प्रमाणीकरण करण्याकरीता वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३) वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, मुंबई यांनी परिवहनेतर संवर्गातील जी वाहने व्हिंटेज अँड क्लासिक कार क्लब ऑफ इंडिया यांच्या प्रमाणपत्रधारक वाहनांनाच मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ५६(१) नुसार योग्यता प्रमाणपत्र जारी करणे/ त्याचे नुतनीकरण करणे/ त्याची दुय्यम प्रत जारी करणे ही सेवा खालील अटींच्या अधीन राहून देईल.

i) वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असेसिएशन, मुंबई या संस्थेद्वारे सदर कामकाजाकरीता कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी हे किमान तीन वर्षे कालावधीचा ऑटोमोबाईल /मेकॅनिकल इंजिनिअरींग डिप्लोमाधारक असावा.

ii) नियुक्त कर्मचाऱ्यास किमान ५ वर्षाचा किमान हलके वाहन संवर्गातील वाहन दुरुस्तीचा अनुभव असावा.

iii) नियुक्त कर्मचाऱ्यास किमान ५ वर्षे हलके वाहन चालविण्याचा अनुभव असावा.

iv) मोटारवाहन कायद्यातील तरतुदी व विशेषत: नोंदणी, वाहन बांधणी व देखभाल यासंदर्भातील तरतुदींची माहिती असावी.

v) ज्या ठिकाणी वाहन तपासणी करणे प्रस्तावित आहे, ती जागा वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन यांचे मालकीची/ भाडयाने घेतलेली असावी ज्यामध्ये वाहनाची यांत्रिक योग्यता तपासणी सुविधा असावी.

vi) वाहनांचे वायु प्रदुषण, इंजिन टयूनिंग, इंजिन तपासणी, ब्रेक यंत्रणा, हेडलाईट यंत्रणा, व्हील अलाईनमेंट तपासणी यंत्रणा, वाहनाचे स्पीडोमीटर व अन्य भागाची तपासणी करण्याची सुविधा असावी.

vii) सदरची सुविधा कार्यरत ठेवण्यासाठी वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन यांनी पुरेशी वित्तीय तरतूद करावी व त्या ठिकाणी मोटार वाहन कायदा व तद्नुषंगिक नियमांच्या अद्यावत प्रती उपलब्ध ठेवाव्यात.

viii) संस्थेने रु.१,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) ची अनामत रक्कम बँक गॅरेंटीचे स्वरुपात परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करावी व वेळोवळी त्याचे नुतनीकरण करुन मुदतीत ठेवण्यात यावी.

ix) व्हिंटेज व क्लासिक संवर्गातील वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र जारी करणे / नुतनीकरण / दुय्यम प्रमाणपत्र यास्तव केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ८१ प्रमाणे शुल्क संबंधितांकडून वसूल करुन ते परिवहन विभागात जमा करावे.

x) संस्थेने त्यांच्या कामकाजांच्या अद्यावत व अचूक नोंदी ठेवून त्या परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना त्यांचे निर्देशाप्रमाणे नियतकालिक अहवालाचे स्वरुपात सादर कराव्यात.

xi) सदर सुविधा तात्पुरत्या स्वरुपात प्रायोगिक तत्वावर एक वर्षाकरीता कार्यरत राहील व या कालावधीनंतर योजनेचा आढावा घेवून यासंदर्भात पुढील निर्णय घेतला जाईल.

xii) सदर योजना कोणतेही कारण न देता बंद करण्याचा शासनास पूर्ण अधिकार राहील या योजनेअंतर्गत कोणतेही मतभेद उत्पन्न झाल्यास ते परिवहन विभागाच्या प्रधान सचिवांमार्फत सोडविले जातील व अशा बाबतीत परिवहन सचिवांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

xiii) सदर योजनेसंदर्भात वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन व परिवहन विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात यावा.

xiv) उपरोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेली मान्यता कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०५१६१५१८१८९१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ghiratkar Nitin Jyotinath

Digitally signed by Ghiratkar Nitin Jyotinath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbb712ac44dfd391a1a4d7d8b24cf743fa81a59477dff3f6805f105ac91db1e0, cn=Ghiratkar Nitin Jyotinath
Date: 2018.05.16 15:18:35 +05'30'

(नि.ज्यो.घिरटकर)
कार्यासन अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५) मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६) मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७) मा. उपसभापती,विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई

९) मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०) मा. संसद सदस्य (महाराष्ट्र राज्य)
११) मा.विधानसभा सदस्य (सर्व)
१२) मा.विधान परिषद सदस्य (सर्व)
१३) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
१५) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१६) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१७) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१९) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई परिवहन उपक्रम, मुंबई.
२०) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
२१) अध्यक्ष, वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, मुंबई.
२२) अध्यक्ष, विंटेज व क्लासीक कार क्लब ऑफ इंडिया, मुंबई.
२३) निवडसंग्रह-परि-२.